**ठळक बातम्या**

- राज्यभरात 'पुढच्या वर्षी लवकर या' च्या गजरात गणपतीबाप्पाला भावपूर्ण निरोप

- पुण्यात पारंपरिक जल्लोषात मानाच्या पाचही गणपतींचं विसर्जन, राज्यभरात पर्यावरणपूरक विसर्जनाला प्राधान्य

- जीएसटी दरकपातीनं जीडीपीत २० लाख कोटी रुपयांची भर पडेल, असा विश्वास केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडून व्यक्त

**आणि**

- मराठा आरक्षणासंदर्भातल्या शासन निर्णयाच्या विरोधात पुढच्या महिन्यात महामोर्चा काढायचा ओबीसी संघटनांचा इशारा

**<><><><><>**

***इंट्रो-***

राज्यभरात आज अनंत चतुदर्शीच्या मुहुर्तावर गणेश विसर्जनानं गणेशोत्सवाच्या मंगल पर्वाची सांगता होत आहे. त्यासाठी राज्यभरात स्थानिक प्रशासनानं चोख व्यवस्था केली आहे. अनेक ठिकाणी कृत्रिम तलावांमध्ये गणपतींचं विसर्जन होतं आहे, तर काही ठिकाणी मूर्तीदानही केलं जात आहे. गणपतींचं दर्शन घेण्यासाठी आणि विसर्जन मिरवणुकीत सहभागी होण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी दिसून येत आहे. विसर्जन मिरवणूक चोख पार पडावी यासाठी पोलिस यंत्रणाही सज्ज आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधींकडून…

***होल्ड… व्हॉइस कास्ट (कौस्तुभ)***

*'गणपतीबाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या गजरात आज राज्यभर लाडक्या बाप्पाला निरोप दिला जात आहे.*

***मुंबई**त दुपारीच लालबागच्या राजाची विसर्जन मिरवणूक सुरू झाली. मंडपात दर्शन न मिळालेल्या भाविकांनी विसर्जन मार्गावर दर्शनासाठी गर्दी केली आहे. गणेश गल्लीतला मुंबईचा राजा, तेजुकाया मॅन्शनचा*

*तेजुकाया गणपती, चिंचपोकळीचा चिंतामणी, गिरगाव इथं खेतवाडीचा राजा, गिरगावचा राजा, अंधेरीचा राजा, केशवजी नाईक चाळीतला मंगलमूर्ती गणराया यासह विविध लोकप्रिय गणेश मंडळांची विसर्जन मिरवणूक सुरू आहे. मुंबई महापालिकेनं गिरगाव, जुहू यासारख्या चौपाट्यांसह ७० नैसर्गिक स्थळं आणि सुमारे २९० कृत्रिम तलावांमध्ये विसर्जनाची सोय केली आहे. सहा फुटापेक्षा कमी उंचीच्या मूर्तींचं विसर्जन कृत्रिम तलावात करावं, असं आवाहन पालिकेनं केलं आहे. १० हजारांहून अधिक कर्मचारी, जीवरक्षक विसर्जनस्थळांवर तैनात आहेत. १८ हजाराहून अधिक पोलीसही ठिकठिकाणी तैनात केले आहेत. याशिवाय १० हजार सीसीटीव्ही कॅमेरे आणि ड्रोनच्या माध्यमातूनही विसर्जन सोहळयावर लक्ष ठेवण्यात येत आहे. आज समुद्रात भरती असल्यानं तसंच जेलीफिश आणि स्टिंगरेचा धोका असल्यानं विशेष काळजी घेण्याचं आवाहन प्रशासनानं केलं आहे.*

***पुण्या**त मानाच्या पाचही गणपतींचं विसर्जन पूर्ण झालं असून इतर गणपतींचं विसर्जन सुरू आहे. ढोल-ताशांच्या तालावर, लेझीमच्या झंकारात आणि गुलालाची उधळण करत श्रद्धाळू मोठ्या संख्येनं सहभागी झाले आहेत. कसबा गणपतीच्या मिरवणुकीत यंदा दिव्यांग मुलांच्या पथकानं वादन सेवा सादर केली. मातीच्या मूर्तींचं कुंडांमध्ये विसर्जन करण्यासाठी नागरिकांचा सहभाग यंदा वाढलेला आहे.*

***सिंधुदुर्गा**त आज १६ सार्वजनिक आणि सुमारे १८ हजार घरगुती बाप्पांचं विसर्जन होत आहे. विसर्जनाच्या दिवशीच्या महाप्रसादाला म्हणजेच 'म्हामन्यासाठी' शेजारपाजारच्या लोकांना भाविकांनी आमंत्रण दिलं आहे.*

***रत्नागिरी**त ३६ हजारांहून अधिक घरगुती तसंच ६१ मंडळांच्या मूर्तींचं विसर्जन होत आहे. त्यासाठी मांडवी, भाट्ये यासह विविध ठिकाणी चोख व्यवस्था असून निर्माल्य कलशही ठेवले आहेत.*

***रायगड**मध्ये १८ हजारांहून अधिक खासगी गणपती तसंच दीडशेहून अधिक सार्वजनिक गणेश मंडळाचं विसर्जन आज होत आहे.*

***धुळे** शहरात महापालिकेनं पांझरा नदीवर ११ ठिकाणी गणेशमूर्ती संकलनाची व्यवस्था केली आहे. तसंच मोठ्या गणपतींचं विसर्जन सुलभ व्हावं यासाठी हत्ती डोहाजवळ रॅम्प तयार केला आहे.*

***नंदुरबार**मध्ये पहिला मान असलेल्या दादा गणपतीचा रथ दोरीने ओढत विसर्जन मिरवणूक सुरू झाली. रात्री उशिरा बाबा गणपतीसोबत त्याची हरिहर भेट होईल.*

***नागपुरा**त महापालिकेनं सर्व तलावांमध्ये गणेशमूर्तींच्या विसर्जनाला मनाई केली आहे. भाविकांच्या सोयीसाठी २१६ ठिकाणी एकूण ४१९ कृत्रिम विसर्जन तलावाची व्यवस्था करण्यात आली आहे.*

***वाशिम**मध्ये सकाळीच गणेश विसर्जन मिरवणुकीला सुरुवात झाली.*

***बुलडाण्या**त सुमारे चौदाशे सार्वजनिक गणेश मंडळांच्या गणपतीचं विसर्जन आज होतं आहे. खामगावमधल्या मानाच्या लाकडी गणपतीची मिरवणूक सकाळीच सुरू झाली. विसर्जन मिरवणुकीत मुलींनी दाखवलेल्या साहसी खेळांमुळे नागरिक थक्क झाले.*

***गोंदिया**त घरगुती गणपतींच्या विसर्जनासाठी जलकुंड तयार करण्यात आलं आहे. काहींनी तर घरीच विसर्जनाला प्राधान्य दिलं आणि निर्माल्यापासून खत तयार होईल, अशी व्यवस्था केली.*

***नाशिक**मध्ये पारंपारिक वाद्यं आणि मर्दानी खेळांचा समावेश असलेल्या विविध मंडळांच्या मिरवणुका सुरू आहेत. गेल्या तीन-चार दिवसांपासून गोदावरी नदीतलं पाणी वाढल्याने नागरिकांनी सावधगिरी बाळगावी असं आवाहन प्रशासनानं केलं आहे.*

***धाराशिव**मध्ये गणेश विसर्जन मिरवणुकांमध्ये देशभक्तीपर देखावे दिसून येत आहेत. अहिल्यानगरात १७ ठिकाणी गणेशमूर्तींचं होणार आहे.*

***नांदेड**मध्ये २८ ठिकाणी मूर्ती संकलन केंद्र आहेत. मोठ्या तलावात सहा फुटाहून अधिक उंचीच्या श्रीमूर्तींचे विसर्जन केलं जात आहे. नांदेडमध्येही डीजेमुक्त विसर्जन मिरवणुकीला चांगला प्रतिसाद मिळत आहे.*

<><><><><>

मुंबईत आत्मघातकी बॉम्बस्फोट घडवून आणायची धमकी देणाऱ्या इसमाला मुंबई गुन्हे शाखेनं उत्तर प्रदेशच्या नोयडा इथून अटक केली. गुन्ह्यात वापरलेला मोबाईल आणि सिमकार्डही पोलिसांनी जप्त केलं. मुंबई वाहतूक पोलिसांच्या व्हॉट्सॲप हेल्पलाइनवर काल हा मेसेज आला होता.

**<><><><><>**

जीएसटी सुधारणेमुळे देशाच्या जीडीपीत २० लाख कोटी रुपयांची भर पडणार असून यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळेल, असा विश्वास माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज नवी दिल्लीत वार्ताहरांशी बोलताना व्यक्त केला. हा मध्यमवर्गासाठी मोठा दिलासा असल्याचं वैष्णव यांनी सांगितलं. ते म्हणाले,

***होल्ड… बाईट अश्विनी वैष्णव***

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा कर परिषदेनं जीएसटीच्या दरांमध्ये केलेली कपात येत्या २२ तारखेपासून लागू होणार आहे. यामुळं दैनंदिन वापराच्या अनेक वस्तूंवरचा कर कमी होणार आहे. याबद्दल अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

***होल्ड… व्हीसी-(भक्ती)***

*(विविध प्रकारची सौंदर्यप्रसाधनं, केसांला लावायचं तेल, शॅम्पू, टूथपेस्ट, टूथब्रश या वस्तूंवरचा जीएसटी १८ टक्क्यांवरून ५ टक्क्यांवर येईल. दात घासायच्या पावडरवरचा जीएसटी १२ टक्क्यांवरून ५ टक्के होईल. कंगवे, केसांसाठी लागणारं साहित्य इत्यादींवरचा १२ टक्के जीएसटी आता ५ टक्के इतका कमी केला आहे. दाढी*

*करण्याचं सामान आणि साबणावर आता १८ टक्क्यांच्या ऐवजी ५ टक्के जीएसटी द्यावा लागेल. रबरबँड्स, विविध पद्धतीचं चामडं, हाताने तयार केलेल्या वस्तू, पिशव्यांवर लागणारा १२ टक्के जीएसटी ५ टक्के होईल. पेन्सिली, रंगीत खडू, जलरंग, खडू इत्यादी साहित्यावर यापुढे कोणताही जीएसटी द्यावा लागणार नाही.)*

<><><><><>

मराठा आरक्षणासंदर्भातल्या शासन निर्णयाला विरोध म्हणून येत्या ऑक्टोबर महिन्यात नागपुरात ओबीसींचा महामोर्चा काढणार असल्याची माहिती काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी आज दिली. विदर्भातल्या ओबीसी संघटनांची बैठक आज नागपुरात झाली. त्यावेळी वडेट्टीवार बोलत होते. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्यासाठी काढलेल्या पहिल्या शासन निर्णयात पात्र हा शब्द होता, मात्र दुसऱ्या शासन निर्णयात तो वगळण्यात आला आहे. याचा अर्थ मराठा समाजाला ओबीसीतून सरसकट आरक्षण देणार असा होतो. हा मूळ ओबीसी समाजावर अन्याय आहे, असं ते म्हणाले. येत्या १२ सप्टेंबर रोजी नागपूरला प्रमुख ओबीसी नेत्यांची बैठक होईल, त्यात या शासन निर्णयाविरोधातल्या लढाईची व्यूहरचना ठरवली जाईल, असंही वडेट्टीवार यांनी सांगितलं. ओबीसींच्या २७ टक्के आरक्षणातून १३ टक्के आधीच वजा होते. उरलेल्या १९ टक्क्यांतही मराठा समाजाला आरक्षण दिलं, तर ओबीसींना किती उरणार? असा सवाल वडेट्टीवार यांनी यावेळी केला.

**<><><><><>**

मुंबई पोलिसांनी ठाण्यातल्या मीरा रोड इथं छापे टाकून एमडी अर्थात मेफेड्रोन या अंमली पदार्थाचा १२ कोटी रुपये किंमतीचा साठा जप्त केला. या कारवाईत एका बांगलादेशी महिलेसह १२ जणांना अटक करण्यात आली. या महिलेकडून २४ लाख रुपयांचे अंमली पदार्थ पोलिसांनी जप्त केले. हे पदार्थ तेलंगणमधल्या एका रसायनांच्या कारखान्यात तयार करून मुंबईला पाठवले जात होते. या प्रकरणाचा पुढचा तपास सुरू आहे.

**<><><><><>**

आशिया करंडक हॉकी स्पर्धेत सुपर फोरमध्ये आज भारताचा सामना चीनविरुद्ध होणार आहे. आत्तापर्यंत भारतानं एका सामन्यात विजय मिळवला आहे, तर दुसरा सामना अनिर्णित राहिला आहे. सुपर फोरच्या गुणतालिकेत भारत सध्या पहिल्या क्रमांकावर आहे. या संपूर्ण स्पर्धेत भारत अजेय राहिल्यानं आशिया करंडकासाठी प्रबळ दावेदार मानला जात आहे. सुपर फोरच्या दुसऱ्या सामन्यात कोरियासमोर मलेशियाचं आव्हान आहे.

**<><><><><>**

गेल्या २४ तासांत कोकणात काही ठिकाणी अतिजोरदार, तुरळक ठिकाणी जोरदार, तर मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडला. कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी, मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी पावसाची नोंद झाली. सध्या जळगांव, धुळे, नंदुरबार आणि नाशिकमध्ये जोरदार पाऊस सुरू आहे. उद्या कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी, तर मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**